# 'टीसीएस आयटी विझ २०१७' चे नागपूर एडिशन १२ सप्टें.ला

**लोकशाही वार्ता/नागपूर**

'टाटा कन्सलटन्सी सर्विसेस' (टीसीएस) या आघाडीच्या आयटी सर्विसेस, कन्सलटिंग आणि बिजनेस सोल्युशन फर्म तर्फे 'टीसीएस आयटी विझ २०१७'च्या नागपूर एडिशनची घोषणा करण्यात आली असून १२ सप्टेंबर २०१७ रोजी सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात याचे आयोजन करण्यात आले आहे.

वर्ग ८ ते वर्ग १२ मधील विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. एका शाळेतून दोन विद्यार्थी असलेल्या एकापेक्षा अधिक चमूदेखील भाग घेऊ शकतात. यासाठी प्रवेश निःशुल्क ठेवण्यात आला आहे. शाळांना आपल्या एन्ट्रीज ९ सप्टेंबरपर्यंत किंवा त्याआधी प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी विझ समन्वयक, अग्रवाल हाऊस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सीताबर्डी, नागपूर येथे नोंदवायच्या आहेत. अधिक माहितीसाठी ९८२२१९३६५५ वर संपर्क साधावा.

वर ऑनलाईन नोंदणीदेखील केली जाऊ शकते. या आयटी विझमध्ये आयटी क्षेत्रासबंधी विविध व्यक्ती, घडामोडी, उपकरण इत्यादींवर प्रश्न विचारले जातील. टीसीएस आयटी विझ २०१७ भारतातील १२ ठिकाणी आयोजित केली जाणार आहे. यात अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. प्रादेशिक फेऱ्यांमधून पात्र झालेल्या चमूंमध्ये डिसेंबरमध्ये होऊ घातलेल्या राष्ट्रीय अंतिम फेरीत मुंबई येथे सामना होईल.